सत्यमेव जयते

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल

श्री. सादिक अली

यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

५ मार्च १९७९

सभापती महोदय, अध्यक्ष महाराज व सन्माननीय सदस्यहो,

१९७९ सालातील, राज्य विधानमंडळाच्या या पहिल्या अधिवेशनाच्या प्रसंगी, मी आपणा सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो.

२. मागील वर्षी मी आपणांसमोर केलेल्या भाषणानंतर राज्यात नवीन मंत्रिमंडळ स्थापन झाले. हे मंत्रिमंडळ, आपल्या स्वतःच्या कार्यक्रमानुसार, सामान्य माणसाच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न चालू ठेवील.

३. पुढील वर्षी जी काही महत्त्वाची कामे माझ्या शासनाला हाती घ्यावयाची आहेत किंवा पुढे चालू ठेवावयाची आहेत, ती आपल्या निदर्शनास आणून देण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

४. महाराष्ट्र राज्याचा १९७८–७९ या वित्तीय वर्षात वार्षिक योजनेवरील अपेक्षित खर्च रुपये ७४९ कोटी होईल. याबाबत नियोजन मंडळाशी विचारविनिमय केल्यानंतर १९७९–८० या वित्तीय वर्षात वार्षिक योजनेचा खर्च रुपये ७६२.५० कोटी असा अंतिमतः निश्चित करण्यात आला आहे. यात केंद्रीय तसेच केंद्रपुरस्कृत योजनांखाली मिळणाऱ्या केंद्रीय मदतीची भर पडेल. पुढील वर्षाच्या योजनेत एकात्मीकृत ग्रामविकास, संमिश्र पाटबंधारे प्रकल्प, वीजनिर्मिती व पारेषण (ट्रान्समिशन) आणि रोजगार हमी योजना यांवर भर देण्याचा प्रयत्न राहील. या कार्यक्रमांसाठी एकूण खर्चाच्या भरीव टक्केवारीत खर्च करण्याचे योजिले आहे.

५. एकात्मीकृत ग्रामविकास कार्यक्रमाखाली, १ एप्रिल १९७८ पासून, भारत सरकारने, संपूर्ण गटांचा सर्वांगीण विकास करण्याचे काम सुरू केले आहे. या कार्यक्रमाखाली, जादा निधीचे वाटप करण्याकरिता गट निवडले जातात आणि जादा रोजगार निर्माण करून लहान व अति लहान जमीनधारक (मार्जिनल) शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर व मागास वर्गातील व्यक्ती यांच्यासारख्या समाजातील दुर्बल घटकांच्या उत्पन्नाची पातळी वाढविण्याच्या उद्देशाने, विविध योजना हाती घेण्यात येतात. भारत सरकारने, या राज्यासाठी, 'लहान शेतकरी विकास यंत्रणा', 'सिंचन क्षेत्र विकास प्राधिकरण' व 'अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम' या क्षेत्रांतील असे एकूण ११६ गट आणि गट पातळीवरील नियोजनाविषयी, दातवाला समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे, इतर क्षेत्रांतील आणखी ११ जादा गट नेमून दिलेले आहेत. या सर्व गटांच्या तपशीलवार योजना तयार करण्यात आल्या असून त्यांना मंजुरी देण्यात आलेली आहे आणि त्यानुसार विविध योजना राबविणे सुरूही झाले आहे. यामध्ये व्यक्तींना लाभप्रद ठरणाऱ्या योजना, पायाभूत सोयींच्या (इन्फ्रास्ट्रक्चर) विकासाच्या योजना आणि पत संस्थांना मदत करण्याच्या योजना अंतर्भूत आहेत. जादा रोजगार निर्माण करण्याच्या व ठराविक गटातील लोकांच्या उत्पन्नाची पातळी वाढविण्याच्या उद्देशाने या योजना आखण्यात आल्या आहेत. या ठराविक गटांमध्ये लहान व अति लहान जमीनधारक शेतकरी, कूळ, शेतमजूर, ग्रामीण कारागीर व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांमधील व्यक्ती यांचा समावेश होतो. हा केंद्रपुरस्कृत कार्यक्रम असून त्यावर १९७९–८० मध्ये, शासनाच्या साधनसंपत्तीतून आवश्यक खर्च केला जाईल. कर्जरूपाने मिळणाऱ्या साह्याची यात भर पडेल. सुमारे ५४ हजार कुटुंबे या कार्यक्रमाखाली आणली जातील.

६. जागतिक बँकेकडून आंतरराष्ट्रीय विकास संघटना सहाय्य मिळण्यासाठी, महाराष्ट्र सरकारने भीमा, कृष्णा, कुकडी, वारणा, अपर वर्धा आणि अपर पेनगंगा हे सहा मोठे पाटबंधारे प्रकल्प त्या बँकेपुढे ठेवले आहेत. या सहा प्रकल्पांतील पाटबंधाऱ्यांच्या घटकांचा अंदाजे खर्च रु. ६५१.३९ कोटी आहे. सध्या त्यांचे मूल्यमापन करण्याचे काम सुरू असून चालू वित्तीय वर्षात यासंबंधीच्या करारांवर सह्या होतील अशी आशा आहे. यासंबंधीच्या वाटाघाटींच्या वेळी गिरणा व मुळा कालवा पद्धतींचे आधुनिकीकरण करावे व महाराष्ट्राच्या संमिश्र पाटबंधारे प्रकल्पात त्यांचा समावेश करावा असेदेखील जागतिक बँकेने मान्य केले आहे. याशिवाय पाटबंधारे विकासाच्या बाबतीत, राज्यातील, त्या मानाने मागास भागांनाच बहुतांशी उपकारक ठरतील असे काही मोठे पाटबंधारे प्रकल्प, जागतिक बँकेकडून किंवा इतर एखाद्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेकडून सहाय्य मिळविण्यासाठी, नुकतेच भारत सरकारकडे पाठविण्यात आले आहेत.

७. ग्रामीण गरीब जनतेच्या हितासाठी राज्य सरकार राबवीत असलेल्या कार्यक्रमांपैकी रोजगार हमी योजना ही सर्वांत महत्त्वाची योजना आहे. राज्याच्या विधानमंडळाने महाराष्ट्र रोजगार हमी विधेयक, १९७७ पारित केले होते व ते विधेयक राष्ट्रपतींच्या संमतीसाठी पाठविण्यात आले होते. दरम्यानच्या काळात राज्य शासनाने असे ठरविले की, या विधेयकातील प्रमुख तरतुदी, प्रशासनिक आदेश काढून, दिनांक ९ ऑगस्ट १९७८ पासून अमलात आणाव्या. या प्रमुख तरतुदींमध्ये बेकारी भत्ता देण्याशी संबंधित तरतूददेखील होती. सभागृहाला हे सांगण्यास मला आनंद वाटतो की, आता या विधेयकाला राष्ट्रपतींनी संमती दिलेली आहे आणि राज्य शासनानेसुद्धा योग्य ती अधिसूचना काढून हा कायदा २६ जानेवारी १९७९ पासून अमलात आणला आहे. रोजगाराच्या हमीस आता कायद्याचा आधार लाभला आहे. भारत सरकारच्या 'कामाच्या मोबदल्यात अन्न' या कार्यक्रमाखाली रोजगार हमी योजनेतील मजुरांना वाटण्यात येणाऱ्या गव्हाचे प्रमाण २३ ऑक्टोबर १९७८ पासून वाढविण्यात आले आहे. रोजगार हमी योजनेतील मजुरांना आता त्यांच्या एकूण रोख मजुरीच्या ४० टक्क्यांपर्यंत गहू देण्यात येतो. यामुळे रोजगार हमी योजनेतील एकूण मजुरीत प्रत्यक्षात सुमारे एकतृतीयांश वाढ झाली आहे. कामाच्या मोबदल्यात अन्न कार्यक्रमाखाली मर्यादित प्रमाणात तांदळाचे वाटप करण्याची योजनासुद्धा विचाराधीन आहे. दिनांक १५ जानेवारी १९७९ रोजी रोजगार हमीच्या कामांवर ६.५३ लाख मजूर हजर होते. यापूर्वीचा त्याच दिवशीचा सर्वोच्च हजेरीचा आकडा ४.४५ लाख असा होता.

८. राज्यातील अविकसित भागांत, म्हणजे विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि कोकण या विभागांत, उद्योगधंद्यांना आकर्षित करण्याच्या हेतूने, या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या संयुक्त क्षेत्रांतील उपक्रमांत सिकॉमला खाजगी उद्योगांबरोबर सहभागी होऊ देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. अशा संयुक्त क्षेत्रांच्या भाग भांडवलात सिकॉमचे अंशदान २६ टक्के असेल. खाजगी क्षेत्रातील उद्योजक २५ टक्के अंशदान देतील व बाकीचे ४९ टक्के भाग भांडवल जनतेसाठी खुले ठेवण्यात येईल.

९. महाराष्ट्रात चर्मोद्योगाच्या विकासासाठी, विशेषतः समाजातील त्या दुर्बल घटकांना मदत करण्याच्या दृष्टीने असलेले 'लिडकॉम'चे महत्त्व लक्षात घेता, शासनाने असा निर्णय घेतला आहे की, 'लिडकॉम'ला महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाची एक दुय्यम कंपनी म्हणून राहू देण्याऐवजी 'लिडकॉम'चा एक स्वतंत्र सरकारी कंपनी म्हणून विकास करावा.

१०. चंद्रपूर जिल्ह्यात असलेल्या चुनखडीच्या मुबलक साठ्याचा पुरेपूर उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने, सुमारे ३० लाख टनांची वार्षिक क्षमता असणाऱ्या दोन मोठाल्या सिमेंट कारखान्यांना इरादापत्रे (लेटर्स ऑफ इंटेंट) मंजूर करण्याविषयी शासनाने भारत सरकारला शिफारस केली आहे. हे प्रकल्प नजीकच्या भविष्यकाळात सुरू होण्याची अपेक्षा आहे. आपल्या दोन्ही सभागृहांनी एकमताने केलेल्या ठरावाप्रमाणे, कुलाबा जिल्ह्यातील थळ येथे 'बॉम्बे हाय' मधील गॅसवर आधारित एक 'रासायनिक खत कारखाना समूह' स्थापन करण्याचे केंद्र सरकारने ठरविले आहे. या प्रकल्पाच्या कामास सुरुवात झालेली आहे. या प्रकल्पामुळे कोकण विभागातील मागास क्षेत्रांमधील उद्योगधंद्यांच्या वाढीच्या प्रक्रियेस गती मिळेल. या प्रकल्पांसाठी पायाभूत सोयी पुरविण्याची जबाबदारी राज्य शासनाने स्वीकारली आहे. सार्वजनिक आणि/किंवा संयुक्त क्षेत्रात बॉम्बे हायमधील गॅसवर आधारलेले 'पेट्रोरासायनिक प्रकल्प समूह' स्थापन करण्याविषयीच्या सर्व बाबींची तपासणी करण्यासाठी व त्याविषयी शासनाला सल्ला देण्यासाठी, शासनाने, अणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. एच्. एन्. सेठना यांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यास गटाची स्थापना केली आहे.

११. काही प्रमुख औद्योगिक आस्थापनांमध्ये दीर्घ कालपर्यंत टाळेबंदी किंवा संप झाले असले तरी वाया गेलेल्या श्रम दिवसांच्या संख्येत एकंदरीने घटच झाली आहे. एप्रिल ते डिसेंबर १९७७ या कालावधीत काम बंद पडण्याच्या ६२० घटना घडल्या होत्या तर १९७८ मधील त्याच अवधीत अशा ५०१ घटना घडल्या. ही परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने माझे शासन अनेक प्रयत्न करीत आहे. या दिशेने एक उपाय म्हणून कामगार आयुक्तांच्या कार्यालयीन यंत्रणेत वाढ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कामगार संघटनांना मान्यता देण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी तसेच औद्योगिक विवादांचे त्वरेने निर्णय लागावेत या दृष्टीने सध्या अस्तित्वात असणाऱ्या दोन राज्य शासनाच्या कायद्यांत व एका केंद्रीय कायद्यात काय बदल करावेत याबद्दल सल्ला देण्यासाठी शासनाने दिनांक १० जानेवारी १९७९ रोजी एक त्रिपक्षीय समिती नेमली आहे.

१२. सुशिक्षित युवकांची बेकारी ही एक गंभीर समस्या आहे. म्हणून शासनाने, १ जानेवारी १९७९ पासून सुशिक्षित बेकारांना, आर्थिक सहाय्य देण्याची एक योजना हाती घेतली आहे. या योजनेनुसार पात्र पदवीधर किंवा एस्.एस्.सी.नंतरची पदविका (डिप्लोमा) धारण करणाऱ्या व्यक्तीला अंशकालिक (पार्ट-टाईम) रोजगार देऊन दरमहा रुपये १०० मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पात्र एस्.एस्.सी. उमेदवारांना, २ ऑक्टोबर १९७८ पासून, दर सहा महिन्यांसाठी रुपये ५० या दराने, आर्थिक मदत देण्यात येते. या योजनेचा उद्देश, लांब मुदतीचा रोजगार पुरविणे हा नाही तर, लांब मुदतीच्या लाभप्रद रोजगाराच्या शोधात असण्याच्या काळात किमान मदत देणे हा आहे.

ही योजना सुशिक्षित बेकारांना बीज भांडवली मदत देण्याच्या योजनेच्या अतिरिक्त आहे. स्वयंरोजगाराच्या (सेल्फ-एम्प्लॉयमेंट) योजना हाती घेण्यास सुशिक्षित बेकारांना उद्युक्त करण्याच्या उद्देशाने, माझ्या शासनाने, एक लाख रुपयांपर्यंत गुंतवणूक असणाऱ्या औद्योगिक प्रकल्पांच्या बाबतीत बीज भांडवली मदत योजनेखालील प्रोत्साहनात बरीच वाढ केली आहे. बिगरमागासवर्गांसाठी बीज भांडवली मदतीचे प्रमाण १० टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले आहे, तर मागासवर्गीय व्यक्तींच्या बाबतीत हे प्रमाण २० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले आहे. जर व्यक्तीचे कौटुंबिक उत्पन्न वार्षिक ४,८०० रुपयांपेक्षा कमी असेल तर हे प्रमाण बिगरमागासवर्गांसाठी १० टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले आहे व मागासवर्गीयांच्या बाबतीत ते २२.५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले आहे.

१३. कापसाच्या एकाधिकार खरेदीची योजना राबविण्याची बांधीलकी माझ्या शासनाने पत्करली होती. त्यानुसार १६ डिसेंबर १९७८ रोजी ही योजना पुन्हा सुरू करण्यात आली. माझ्या शासनाची भूमिका समजावून घेऊन आवश्यक ती मदत करण्याचे भारत सरकारने मान्य केल्यामुळे ही योजना राबविणे माझ्या शासनाला शक्य झाले. त्याबद्दल शासन आभारी आहे. राज्यातील कापूस उत्पादकांनी या योजनेला दिलेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे याबद्दल मला समाधान वाटते. आधीच्या योजनेतील जे अनेक दोष कापूस उत्पादकांच्या रोषाला कारणीभूत झाले होते ते या सुधारित योजनेतून काढून टाकण्याचा शासनाने प्रयत्न केला आहे. या योजनेमुळे मध्यस्थांकडून होणाऱ्या पिळवणुकीपासून शेतकऱ्यांचे रक्षण तर झालेच पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट ही की, त्यामुळे त्यांना त्यांच्या उत्पादनाची हमी किंमत मिळाली. सध्या शेतमालाच्या किंमती घसरत आहेत अशा वेळी तर हमी किंमतीची अत्यंत जरूर आहे. १६ डिसेंबर १९७८ पासून चालू हंगाम संपेपर्यंत ४० लाख क्विंटल (सुमारे ८ लाख गाठी) कापूस खरेदी केला जाईल अशी अपेक्षा होती. २० फेब्रुवारी १९७९ पर्यंतच सुमारे २९.०६ लाख क्विंटल कापूस (मूल्य रु. १०७.५६ कोटी) खरेदी करण्यात आला. सुमारे १.४ लाख गाठी कापसाच्या विक्रीचे करार करण्याविषयीच्या वाटाघाटी फेब्रुवारी १९७९ च्या मध्यापर्यंत पूर्ण झाल्या आहेत.

१४. १९७७–७८ च्या गळीत हंगामात या राज्यातील सहकारी साखर कारखान्यांनी १६७.०५ लाख टन ऊस गाळला व १८.२२ लाख टन साखरेचे उत्पादन केले. साखरेचा उतारा १०.९० टक्के होता. राज्यातील खाजगी साखर कारखान्यांचे उत्पादन धरून गाळलेला एकूण ऊस १९२.४५ लाख टन एवढा आहे व त्यापासून २०.९६ लाख टन साखरेचे उत्पादन झाले. राज्यातील साखरेचे एकूण उत्पादन हे १९७६–७७ या वर्षीच्या एकूण उत्पादनापेक्षा ५.३९ लाख टनांनी अधिक आहे म्हणजेच साखर उत्पादनात ३४.६४ टक्क्यांनी वाढ झाली. हे उत्पादन, या हंगामात देशात झालेल्या साखरेच्या एकूण उत्पादनाच्या ३२.२ टक्के आहे. सध्या १२ साखर कारखान्यांच्या उभारणीचे काम चालू असून त्यांपैकी ४ कारखाने चालू वर्षात चाचणीसाठी चालविण्यात येतील अशी अपेक्षा आहे. साखरेवरील नियंत्रणे उठविल्यामुळे साखरेच्या किंमती उत्पादकांना परवडेनाशा झाल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील बहुसंख्य साखर कारखाने अडचणीत आले आहेत. राज्य शासनाला या समस्येची पूर्ण जाणीव आहे. साखर उत्पादन हा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील एक महत्त्वाचा उद्योग आहे. या उद्योगाला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी, मध्यवर्ती शासनाकडे, काही बाबतींत, माझ्या शासनाने आग्रह धरला असून या संदर्भात या कारखानदारीस मदत करण्यासाठी, माझे शासनही आपले धोरण लवकरच जाहीर करील.

१५. दुग्धव्यवसायाच्या विकासासाठी जेथे 'ऑपरेशन फ्लड' कार्यक्रम हाती घेण्यात आला असेल तेथे शासन चालवीत असलेल्या दुग्धशाळा, योग्य शर्तीवर, सहकारी दूध उत्पादक संस्थांच्या महासंघांकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचप्रमाणे सहकारी क्षेत्रात दुग्धशाळा व प्रशीतन केंद्रे (चिलिंग प्लँट्स) उभारली जाण्यास उत्तेजन देण्याच्या दृष्टीने, शासनाने, राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाची योजना, त्या महामंडळाकडून सहाय्य मिळविण्यासाठी, मान्य केली आहे. सहकारी दूध उत्पादक संस्थांना या महामंडळाकडून ७० टक्के कर्ज मिळेल, २० टक्के रक्कम राज्य शासनाकडून भाग भांडवली अंशदान म्हणून मिळेल व बाकीची १० टक्के रक्कम सहकारी दूध उत्पादक संस्था स्वतःच उभारतील.

१६. राज्याच्या काही विवक्षित भागात पावसात प्रदीर्घ खंड पडला. काही ठिकाणी पाऊस अजिबात पडला नाही व काही ठिकाणी अपुरा पाऊस पडला. त्यामुळे भाताच्या व खरिपाच्या पिकांचे नुकसान झाले, तसेच हिवाळा उशिरा सुरू झाल्यामुळे गव्हाच्या पिकावरही काही प्रमाणात परिणाम झाला. तथापि, १९७८–७९ या वर्षाचा शेतीचा हंगाम हा एकंदरीने समाधानकारकच म्हटला पाहिजे. मागील वर्षाशी तुलना करता, बाजरी व ज्वारी यांच्या लागवडीखालील क्षेत्रात थोडीफार घट झाली, तर कापसाच्या लागवडीखालील क्षेत्र थोडेफार वाढले आहे. ऑगस्टमधील तुटपुंज्या पावसामुळे खरीप पिकांवर काही काळ ताण पडला, परंतु मागाहून भरपूर पाऊस झाल्यामुळे स्थिती काही प्रमाणात सुधारली. १९७९–८० या वर्षी जास्त अन्नधान्य उत्पादन करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. पाटबंधारे व आयाकट विकास यांखालील क्षेत्र वाढविणे, पिकांच्या अधिक उत्पन्न देणाऱ्या, तसेच संकरित जातींच्या बियाण्यांची पेरणी जास्त क्षेत्रात करणे, रासायनिक खतांचा वापर अधिक प्रमाणात करणे या उपायांचा अवलंब करून पीक संरक्षणाच्या योजनांची अंमलबजावणी अधिक जोमाने करणे, यांसारखे विविध विकासविषयक कार्यक्रम हाती घेऊन हे उद्दिष्ट साध्य करण्याचा शासन प्रयत्न करील. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाच्या किफायतशीर किंमती मिळवून देण्यासाठी माझे सरकार झटत आहे व राज्य शासनाने भारत सरकारकडे या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी आग्रह धरला आहे. उत्पादन खर्च कमी करण्याच्या दृष्टीने, माझे शासन, स्वतःच्या अधिकारात करता येण्यासारखे उपायसुद्धा योजीत आहे. कृषिउत्पादनासाठी घेतलेल्या विवक्षित अल्प मुदतीच्या कर्जावरील व्याजाच्या दरात अर्थसहाय्य देण्याविषयीचे, पात्र आदिवासी शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्जे मंजूर करण्याविषयीचे आणि अवर्षणप्रवण क्षेत्रातील पात्र शेतकऱ्यांना तसेच लहान व अति लहान जमीनधारक शेतकऱ्यांना ४ टक्के या सवलतीच्या व्याजाच्या दराने कर्ज मंजूर करण्याविषयीचे आदेश काढण्यात आले आहेत. शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या पंपाकरिता लागणाऱ्या विजेचा आकारणी दरसुद्धा शासनाने कमी केला, तसेच मृद संधारणाच्या देय रकमा भरण्याच्या संबंधातदेखील शासनाने सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या पूरग्रस्त जिल्ह्यातील, ४ हेक्टरपर्यंत जमीन धारण करणाऱ्या पूरग्रस्त शेतकऱ्यांना रब्बी पिकांसाठी बी-बियाण्यांचा मोफत पुरवठा करून व ४ हेक्टरपेक्षा अधिक जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना तगाई कर्ज म्हणून बी-बियाणे पुरवून सहाय्य पुरविण्यात आले आहे.

१७. हातमाग, यंत्रमाग व सहकारी वस्त्रनिर्माण उद्योगांपुढील समस्यांची शासनाला जाणीव आहे. सुमारे ९,३०० माग, हातमाग उद्योगाच्या विकासाच्या योजनेखाली आणले गेले आहेत आणि बहुतांशी समाजाच्या दुर्बल घटकांतीलच असणाऱ्या विणकरांना या योजनेचा लाभ मिळेल अशी अपेक्षा आहे. ही योजना अमलात आणल्यामुळे या ९,३०० विणकारांना रोजगार पुरविणे शक्य होईल.

१८. भारत सरकार, १९७९ हे वर्ष 'राजभाषा वर्ष' म्हणून साजरे करणार आहे. महाराष्ट्र शासनानेदेखील १९७९ हे वर्ष 'राजभाषा वर्ष' म्हणून पाळण्याचे ठरविले आहे. या राज्याच्या राजभाषेचा, म्हणजेच मराठीचा राज्याच्या प्रशासनाच्या सर्व कामकाजात वापर करण्याचे जोरदार प्रयत्न या वर्षामध्ये करण्यात येतील.

१९. उर्दू अकादमीचे कार्य विस्तारण्याच्या उद्देशाने, मराठी पुस्तकांची उर्दूमध्ये आणि उर्दू पुस्तकांची मराठीमध्ये भाषांतरे करणे, उर्दू न जाणणाऱ्या लोकांसाठी प्रशिक्षण वर्गाची सोय करणे, उर्दू अक्षरलेखनकला केंद्रे सुरू करणे, व्याख्याने व चर्चासत्रे आयोजित करणे, निबंधलेखन, वक्तृत्व, गझल गायन आणि उर्दू नाटके यांच्या आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा आयोजित करणे अशा विविध योजना हाती घेण्यात येतील.

२०. समाजाच्या दुबळया घटकांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देण्याच्या कार्यक्रमानुसार 'शेतजमीन कमाल मर्यादा अधिनियमा' मध्ये १९७५ साली सुधारणा करण्यात आली होती. मूळ व सुधारित अधिनियमांखालील एकूण २.७२ लाख हेक्टर जमीन अतिरिक्त जमीन म्हणून घोषित करण्यात आली होती. डिसेंबर १९७८ अखेरीपर्यंत एकूण १.७७ लाख हेक्टर अतिरिक्त जमीन १.०४ लाख व्यक्तींना वाटून देण्यात आली आहे. अशा प्रकारे वाटून देण्यात आलेल्या जमिनींपैकी ५२ टक्क्यांहून अधिक जमीन, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती आणि नवबौद्ध यांना वाटून देण्यात आली आहे आणि उरलेली ४८ टक्के जमीन इतर भूमिहीन व्यक्तींना वाटून देण्यात आली आहे. कालबद्ध कार्यक्रम ठरवून उरलेली जमीन वाटून द्यावी असे निदेश माझ्या सरकारने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. ज्यांच्या बाबतीत न्यायालयांनी स्थगनादेश दिलेले आहेत त्या जमिनींखेरीज इतर सर्व जमिनींचे लवकरच वाटप होईल अशी अपेक्षा आहे.

लागवडीकरिता जमीन नेहमीच हवी असते आणि त्याच्या परिणामी शासकीय जमिनीवर अतिक्रमणे होतात. ही राज्याची फार जुनी समस्या आहे. शासनाने अलीकडेच असा निर्णय घेतला आहे की, शासकीय पडीत जमीन, गायरान जमीन आणि महसूल व वन विभागाच्या ताब्यातील वन जमीन यांवर जी अतिक्रमणे करण्यात आलेली असतील व जी ३१ मार्च १९७८ रोजी अस्तित्वात असतील ती अशा रीतीने नियमांत बसवावी की, अतिक्रमण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या खात्यावरील एकूण क्षेत्र हे २ हेक्टरपेक्षा अधिक होणार नाही. अतिक्रमण करणाऱ्या ज्या व्यक्ती अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, नवबौद्ध यांच्यापैकी असतील किंवा ज्यांचे वार्षिक उत्पन्न ३,६०० रुपयांपेक्षा अधिक नसेल त्यांच्याच बाबतीत अशी अतिक्रमणे नियमांत बसवावयाची आहेत. मात्र अशा व्यक्ती त्या जमिनीपासून ८ कि.मी.च्या आत राहत असल्या पाहिजेत. याबरोबरच आणखी अतिक्रमणे होण्यास आळा बसावा म्हणून खंबीर उपाय योजण्याचेसुद्धा शासनाने ठरविले आहे.

२१. राज्याच्या काही भागात पाऊस अजिबात न पडल्याने किंवा तो अपुरा पडल्याने विशेषत: लहान आणि अति लहान जमीनधारक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. पंधरा जिल्ह्यांमध्ये खरीप पिकांचे नुकसान झाले आहे आणि जवळजवळ सात हजार खरीप गावांमधील पिकांची आणेवारी ही सहा आण्यांहूनही कमी झाली, परिणामी या गावांमध्ये टंचाईची किंवा टंचाईसदृश परिस्थिती निर्माण झाली. अशा प्रकरणी शेतकरी आणि शेतमजूर यांचे जे नुकसान झाले त्याबाबत त्यांना सहाय्य करण्याच्या उद्देशाने सर्व धडधाकट व्यक्तींना रोजगार हमी योजनेखाली काम देण्यासाठी, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी, गुरांना वैरण पुरविण्याची व्यवस्था करण्यासाठी आणि वृद्धांना आणि आजाऱ्यांना सानुग्रह सहाय्य देण्यासाठी उपाय योजण्यात येत आहेत. राज्यात रोजगार हमी योजनेखाली एकूण सुमारे ७,००० कामे चालू केली असून त्यात सुमारे सहा लाख मजुरांना काम मिळू शकेल.

२२. गेल्या काही दिवसांत राज्याच्या प्रामुख्याने विदर्भ विभागात आणि नजीकच्या धुळे व जळगाव या जिल्ह्यांत झालेल्या गारपिटीमुळे व अवेळी पडलेल्या पावसामुळे उभ्या पिकांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घरांची पडझड झाली व गुरे दगावली. याशिवाय सात माणसेही मृत्यूमुखी पडली. ह्या झालेल्या नुकसानीबद्दल शासकीय योजनेनुसार योग्य ती मदत करण्याचे कार्य चालू झाले आहे.

२३. किमान गरजांच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ग्रामीण क्षेत्रातील भूमिहीन आणि बेघर शेतमजुरांना घराकरिता जागा उपलब्ध करून देण्याचे व घरकुले बांधण्याचे काम चालू आहे.

माझ्या सरकारने अलीकडेच ही योजना सुधारली असून प्रत्येक घरकुलाचा खर्च रुपये ७५० वरून रुपये १,५०० पर्यंत वाढविण्यात आला आहे. पूर्वी ५,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावास ही योजना लागू करण्यात येत होती परंतु आता सर्वच ग्रामीण भाग या योजनेखाली आणला गेला आहे. जुन्या योजनेनुसार १९७२ साली केलेल्या गावांच्या यादीत ज्या गावांचा समावेश नव्हता ती गावेदेखील आता या सुधारलेल्या योजनेनुसार पात्र ठरतील. १५,००० पेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या प्रत्येक 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या भूमिहीन व बेघर व्यक्तींना घरकुलासाठी जागा मोफत दिली जाईल.

२४. खाजगी वने (संपादन) अधिनियम, अमलात आणल्यामुळे, वन विभागाने जवळजवळ १.९३ लाख हेक्टर खाजगी वन जमीन ताब्यात घेतली. याचा ५१,६०० खातेदारांवर परिणाम झाला. पुढे असे निदर्शनास आले की, अशा परिणाम झालेल्या खातेदारांपैकी बहुसंख्य खातेदार हे लहान शेतकरी आहेत. म्हणून, या अधिनियमात सुधारणा करण्यात आली. सुधारलेल्या अधिनियमाच्या उपबंधान्वये जर परिणाम झालेल्या व्यक्तीची एकूण धारण जमीन ही ३० ऑगस्ट १९७५ ला, संपादनाच्या परिणामी, १२ हेक्टरपेक्षा कमी झाली असेल तर, अशा खातेदाराकडून संपादन केलेली संपूर्ण वन जमीन किंवा तिचा भाग त्या खातेदाराला अशा रीतीने परत देण्यात येईल की, त्या दिवशी त्याची एकूण धारण जमीन १२ हेक्टरपेक्षा अधिक होणार नाही. परिणाम झालेल्या अल्प भूधारकांपैकी अंदाजे ८५ टक्के अल्प भूधारकांना, या उपबंधानुसार, त्यांच्याकडून संपादन केलेली संपूर्ण जमीन किंवा तिचा भाग परत मिळेल. पात्र खातेदारांना त्यांच्या संपादित जमिनी परत देण्याचे काम वेगाने होत असून जवळजवळ ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

२५. राज्यातील ९ राष्ट्रीय महामार्गांच्या २,८८० किलोमीटर या एकूण लांबीपैकी २,४५० किलोमीटर एवढ्या लांबीत एकेरी वाहन मार्ग दुहेरी करण्यासाठी रस्त्यांचे रुंदीकरण, पुलांचे बांधकाम, रस्ता रुंदीकरणानंतर जलनिस्सारणाची (क्रॉस ड्रेनेज) रुंदी वाढविणे इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली आहेत. ठाणे व भिवंडी या शहरांबाहेरील कशेळी व कळवा खाडीवरील नियोजित पर्यायी रस्त्यांवर मोठे पूल बांधण्याचे काम चालू आहे. तेल व नैसर्गिक वायु आयोगाच्या 'बॉम्बे हाय' या प्रकल्पाच्या सोयीसाठी उरण-पनवेल मार्गाची सुधारणा करण्याचे काम तसेच थळ-वायशेत रासायनिक खत प्रकल्पाच्या आसपासच्या मार्गाची सुधारणा करण्याचे कामदेखील शासनाने हाती घेतले आहे.

२६. विधानभवनाच्या नवीन इमारतीचे बांधकाम वेगाने चालू असून ते १९८० मध्ये पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. मुंबई येथे नवीन विक्रीकर भवनाचे बांधकाम, इंडियन मेडिकल कौन्सिलने घालून दिलेल्या नियमानुसार राहिलेला बॅकलॉग पूर्ण करण्याच्या दृष्टीने वैद्यकीय महाविद्यालयांच्या रुग्णालयांतील खाटा वाढविणे, जनजाती क्षेत्रातील आदिवासी सेवा संस्थांसाठी गोदामे बांधणे, आश्रम शाळा उघडणे व पोलिसांसाठी गृहनिर्माण इत्यादी कामे चालू वित्तीय वर्षी हाती घेण्यात येत आहेत.

२७. रोजंदार आणि कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना अस्थायी आस्थापनेत रूपांतरित करण्याचे ठरविण्यात आले आहे. कालेलकर निवाडा शासनावर बंधनकारक आहे असा निर्णय उच्च न्यायालयाने आता दिल्यामुळे, या निर्णयानुसार क्षेत्र कर्मचाऱ्यांचे गाऱ्हाणे दूर करण्याच्या दृष्टीने रोजंदार व कार्यव्ययी आस्थापनेचे नेहमीच्या अस्थायी आस्थापनेत रूपांतर करण्यावरील बंदी उठविण्यात आली आहे.

२८. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन झाल्यापासून राज्याच्या विविध क्षेत्रांत, विशेषेकरून कमी उत्पन्न असणाऱ्या गटांसाठी घरे बांधण्याचा आणि योजनाबद्ध रीतीने इतर सोयी करण्याचा एकात्मीकृत गृहनिर्माण विकास कार्यक्रम हाती घेणे शक्य झाले आहे. शहरातील गरिबांना त्यांच्या कुवतीनुसार स्वतःची घरे बांधता यावीत म्हणून, त्यांना घरांसाठी विकसित जागा पुरविणे चालू ठेवण्यात येईल. आवश्यक त्या सभोवतालच्या सुखसोयी पुरवून गलिच्छ वस्तीत सुधारणा करण्याचे काम चालू ठेवण्यात येईल आणि सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक नसलेल्या खाजगी जमिनीवरील गलिच्छ वस्त्यांमध्ये या सुखसोयींची तरतूद करण्याचा खर्च शासनाकडून केला जाईल. सुमारे १५० चौ.फूट सरकारी जमिनीवर राहणाऱ्या गलिच्छ वस्तीतील कुटुंबांचा, राहण्यासाठी ती जागा ताब्यात ठेवण्याबद्दलचा, भरपाईचा दर १ एप्रिल १९७८ पासून पूर्वलक्षी प्रभावासह दरमहा १५ रुपयांवरून ११ रुपयांपर्यंत कमी करण्यात आला आहे. मुंबई शहरातील जुन्या इमारती दुरुस्त करणे तसेच इमारती पुन्हा बांधणे या महत्त्वाच्या कामाकडे योग्य ते लक्ष पुरविले जाईल.

२९. जमिनीच्या पृष्ठभागावरील तसेच जमिनीखालील पाण्याच्या सर्व साधनांचा अंदाज घेऊन राज्यातील सातत्याने अवर्षणप्रवण असलेल्या तसेच पाटबंधाऱ्यांच्या सोयींच्या दृष्टीने मागासलेल्या भागांच्या गरजा लक्षात घेऊन, जास्तीत जास्त लाभदायक रीतीने, त्यांचा पुरेपूर वापर करण्याचे मार्ग व उपाय सुचविण्याकरिता, ओलिताखालील कृषि क्षेत्रातील विद्यमान परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी एक कृषि-पाटबंधारे आयोग स्थापन करण्याचे शासनाने ठरविले आहे.

३०. गोदावरी पाणी वाटप तंटयातील सर्व बाबी, न्यायाधिकरणाबाहेर, परस्पर वाटाघाटींनी सोडविण्यात आल्या आहेत हे सांगण्यास मला आनंद होतो. तदनुसार एक सर्वसमावेशक करार करून, या करारातील शर्तीस अनुसरून न्यायाधिकरणाने यासंबंधात आपला निवाडा द्यावा, यासाठी तो (करार) लवकरच न्यायाधिकरणापुढे ठेवण्याचे योजिले आहे.

नर्मदा पाणी वाटप तंटा न्यायाधिकरणाचा निवाडा जाहीर झाला आहे. त्या निवाडयानुसार आपल्या राज्याच्या पाटबंधारेविषयक मागण्या पूर्णपणे भागविण्यात आल्या आहेत. परंतु वीजनिर्मिती-विषयीच्या मागण्या मात्र फक्त काही प्रमाणातच भागविण्यात आल्या आहेत.

आता कृष्णा, गोदावरी आणि नर्मदा या नद्यांच्या पाणी वाटपाबाबतचे आंतरराज्यीय तंटे निकालात निघाल्यावर आपला जवळपास कोणताही आंतरराज्यीय नदी पाणी वाटप तंटा शिल्लक राहणार नाही.

३१. कोकण विभागात, खार जमीन विकासाचा कार्यक्रम अतिशय महत्त्वाचा असून त्यामुळे शेतजमिनींचे संरक्षण होऊन शेतमालाच्या उत्पादनात वाढ होते. या विकास कार्यक्रमाची गती वाढविण्यासाठी, विद्यमान खार जमीन अधिनियम, १९४८ याऐवजी नवीन कायदा करून, या योजनेच्या अंमलबजावणीची तसेच तिची कामे व परिरक्षण यांविषयीची जबाबदारी शासनाने सर्वस्वी स्वतःकडे घेतली आहे.

३२. समाजाच्या बदलत्या गरजा व परिस्थिती यांस अनुसरून राज्य पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीने पोलीस दळणवळण सुविधा वाढविणे, आणि तपासाच्या कामासाठी पोलिसांना शास्त्रीय साधने उपलब्ध करून देणे, यांसाठी उपाय योजण्यात आले आहेत.

बृहन्मुंबईच्या आणि प्रामुख्याने उपनगरांच्या वाढत्या लोकवस्तीच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने, जुहू येथील आर्. एन्. कूपर रुग्णालयाच्या आवारात, कॉरोनरचे एक जादा न्यायालय स्थापन करण्यात येत आहे.

३३. ग्रामीण क्षेत्रात शालेय-पूर्व शिक्षणाच्या सोयींची तरतूद करण्यात येत आहे. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल म्हणून ग्रामीण व जनजाती क्षेत्रातील प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पटावरील संख्येत वाढ व्हावी याकरिता एकशिक्षकी प्राथमिक शाळांचे टप्प्याटप्प्याने दोनशिक्षकी शाळांमध्ये रूपांतर करण्यात येत आहे.

केंद्र शासनाने राष्ट्रीय पातळीवर ठरविल्याप्रमाणे राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात २ ऑक्टोबर १९७८ रोजी राज्यात करण्यात आली. या कार्यक्रमाचे सर्वंकष नियोजन व अंमलबजावणी करण्याबाबत शासनाला सल्ला देण्यासाठी राज्य प्रौढ शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

स्थानिक संस्थांनी चालविलेल्या प्राथमिक शाळांतील पहिली ते चौथी इयत्तांतील मागासलेल्या वर्गांच्या आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी १९७६–७७ साली पुस्तकपेढीची योजना सुरू करण्यात आली. गेल्या दोन वर्षांत या योजनेची व्याप्ती क्रमशः वाढविण्यात आली असून येत्या वर्षी ही योजना दहाव्या इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठीही लागू करण्यात येणार आहे. अशा रीतीने येत्या वर्षाच्या अखेरीपर्यंत शालेय स्तरावरील सर्व गरीब विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळू शकेल.

१९७४ च्या विद्यापीठ अधिनियमांत अलीकडेच सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालये यातील शिक्षकांची आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त व भटक्या आणि इतर मागास वर्ग यांतील उमेदवारांसाठी विहित प्रमाणात राखून ठेवण्याचे बंधन, विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये यांवर राहील.

३४. मच्छीमार व बी.ई.एस्.टी. यांना, कदाचित आवश्यक असेल असे विवक्षित लहानसे क्षेत्र वगळता, बॅकबे क्षेत्रातील जमिनीच्या पुनःप्रापणाचे पुढील काम थांबविण्याचे शासनाने ठरविले आहे. शासनाने आणखी असेही ठरविले आहे की, वाटप न केलेले सर्व भूखंड हे फक्त सार्वजनिक प्रयोजनाकरिताच वापरण्यात यावेत.

शासनाने, १.३३ किंवा अनुज्ञेय असेल ती मर्यादा, यांपैकी कमी असेल तेथपर्यंतच एफ्.एस्.आय्. मर्यादित करण्याचे ठरविले आहे.

३५. नव्या मुंबईत वाशीजवळ कृषि उत्पादन घाऊक बाजार व लोखंड व पोलादाचा घाऊक बाजार तसेच नव्या मुंबईतील कळंबोळी येथे स्टॉकयार्ड नव्याने स्थापन करण्याचे योजिले आहे. तदनुसार कांदेबटाटच्यांचा घाऊक बाजार २६ जानेवारी १९७९ रोजी नव्या मुंबईतील वाशी येथे सुरू झाला आहे. घाऊक कापड बाजार वांद्रे-कुर्ला भागात हलविण्याचे योजिले आहे. अशा रीतीने नवीन व्यवस्था स्थिर झाल्यावर मुंबई शहरातील दाटी कमी होण्यास आणि मुंबई महानगर क्षेत्राची पुनर्रचना करण्यास बरीच मदत होईल.

३६. जननप्रमाण हजारी ३० इतके कमी व्हावे यासाठी, या राज्याने, यापूर्वीच्या वर्षात, कुटुंब कल्याण कार्यक्रमाची जी पातळी गाठली होती त्या इष्टतम पातळीवर तो कार्यक्रम पुन्हा आणावा, असा शासनाचा हेतू आहे. तीन किंवा त्यांहून अधिक मुले हयात असलेल्या ३० लाख दांपत्यांना यापूर्वीच या कार्यक्रमाच्या कक्षेत आणले गेले असून अजून १७ लाख दांपत्यांना हा कार्यक्रम लागू करावयाचा आहे. उर्वरित पात्र दांपत्यांना छोट्या कुटुंबाचा आदर्श स्वीकारण्यास प्रवृत्त करण्याच्या बाबतीत त्वरित उपाययोजना करण्यात येत आहे.

३७. १९७९ हे वर्ष आंतरराष्ट्रीय बालक वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले आहे. म्हणून या वर्षात ग्रामीण, जनजाती व नागरी क्षेत्रांमधील गरजू मुलांना लाभ व सेवा उपलब्ध करून देणारे विविध कार्यक्रम हाती घेण्याचे माझ्या शासनाने ठरविले आहे. अतिशय कमकुवत व दुर्बल बालकांचा अंतर्भाव होईल अशा रीतीने, आंतरराष्ट्रीय बालक वर्ष कार्यक्रमासाठी निवडलेल्या गावांतून मुलांची रोगप्रतिकार क्षमता वाढविण्याच्या मोहिमा आयोजित करण्यात येतील. स्थानिक क्षेत्रांतील आरोग्य विभाग तसेच स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे हा कार्यक्रम अमलात आणतील. लागेल तेवढी लस-देखील या केंद्रांकडून पुरविण्यात येईल. आंतरराष्ट्रीय बालक वर्ष जिल्हा समित्यासुद्धा, खाजगी वैद्यक व्यवसायी व स्वेच्छा संस्था या कार्यक्रमात सहभागी होऊन महत्त्वाचे काम करतील याची खात्री करून घेतील. त्याचबरोबर, मुलांमधील अंधत्वास आणि सुयोग्य आहाराअभावी होणारा रक्तक्षय (ॲनिमिया) यांना आळा घालण्यासाठी जीवनसत्त्व 'अ' लोह व फॉलिक ॲसिड यांचे मोठ्या प्रमाणावर वाटप करण्याचे कामसुद्धा हाती घेण्यात येईल. निवडक गावांतील स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रे व उप-केंद्रे, स्थानिक खाजगी वैद्यक व्यवसायी इत्यादींच्या सहाय्याने, निवडक गावांमध्ये सामूहिक आरोग्य तपासणीचा कार्यक्रम आयोजित करतील. आरोग्य विभाग व स्थानिक स्वेच्छा संस्थादेखील निवडक गावांमध्ये कुटुंब कल्याणाच्या जोरदार मोहिमा आयोजित करतील. निवडक गावांमध्ये (अ) पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा पुरवठा करणे, (ब) विहिरींमधील पाणी जंतुविरहित करणे, (क) परिसराची व शारीरिक स्वच्छता इत्यादी गोष्टींबाबत खात्री करून घेण्यासाठी स्थानिक शासन व बिगर सरकारी संस्था सतत प्रयत्नशील राहतील.

३८. पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी गट मतदार संघांचे सीमांकन करण्याची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमात सुधारणा करण्याकरिता ११ जानेवारी १९७९ रोजी एक अध्यादेश काढण्यात आला होता. अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या सदस्यांना पंचायत समित्यांचे सदस्य म्हणून स्वीकृत करून घेण्याऐवजी सरळ निवडणुकीद्वारे त्यांना निवडून आणण्यासाठी त्यांच्याकरिता जागा राखून ठेवण्याची तरतूदही या अध्यादेशाद्वारे करण्यात आली आहे. २३ जिल्हा परिषदांची, त्याचप्रमाणे शासनाने ताब्यात घेतलेल्या नाशिक जिल्हा परिषदेच्या प्रशासकाची मुदतदेखील या अध्यादेशाद्वारे ३० जून १९७९ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या, तसेच जिल्हा परिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष आणि पंचायत समित्यांचे सभापती यांच्या निवडणुकांचा कार्यक्रम ३० जून १९७९ पर्यंत पूर्ण करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहे.

३९. निकृष्ट आहाराच्या दुष्परिणामांना तोंड देण्यासाठी तसेच शाळांतील विद्यार्थ्यांची हजेरी वाढविण्यासाठी ग्रामीण क्षेत्रातील प्राथमिक शाळांमधील मुलांना दुपारचे जेवण किंवा शाळेतर्फे आहार पुरविण्याची योजना अधिक जोरदार करण्यात आली असून, ग्रामीण क्षेत्रातील सर्व प्राथमिक शाळांमधील

६ ते ११ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना पुढील चार वर्षांत या योजनेचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा आहे. चालू वर्षी या योजनेखाली ७ लाख मुलांचा समावेश केला गेला आहे. १९७७–७८ मध्ये ही मुलांची संख्या २.२५ लाख अशी होती.

४०. गावांना स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी पुरविणे ही एक मूलभूत गरज असून ६ व्या पंचवार्षिक योजनेत सर्व गावांना पिण्याचे स्वच्छ पाणी पुरविले जावे याकरिता शासन सर्वतोपरी प्रयत्न करील.

४१. काही दिवसांपूर्वी विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावरून मराठवाडा आणि नागपूर व नाशिक या जिल्ह्यांत दंगली उसळल्या. त्यात १४ व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या आणि बऱ्याच लोकांचे आर्थिक नुकसान झाले. या दंगलीमुळे नुकसान झालेल्या कुटुंबांना शासनाने अत्यंत तातडीने सहाय्य करून त्यांच्या पुनर्वसनाचे काम त्वरित पूर्ण केले. याकरिता वेगवेगळ्या गावांत १,०४१ नवीन घरे बांधून आणि दुरुस्त करून देण्यात आली व १,८०० कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मृत्यू पावलेल्या प्रत्येक व्यक्तीमागे त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य करण्यात आले. गावांमध्ये ज्याच्या धंद्यावर अनिष्ट परिणाम झाला होता अशा कोणत्याही व्यक्तीला धंदा पुन्हा सुरू करण्याकरिता मदत करण्यात आली.

४२. अन्नधान्याच्या सक्तीच्या लेव्हीचा कायदा आपल्या राज्यात नाही, त्याऐवजी शेतकऱ्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी आधार किंमतीस खरेदीची योजना अमलात आणली जात आहे. या योजनेखाली, 'महाराष्ट्र राज्य सहकारी खरेदी-विक्री महासंघ' आणि 'महाराष्ट्र राज्य सहकारी जनजाती विकास महामंडळ' या एजन्सींच्या मार्फत खरेदी केली जाते. या योजनेखाली, विहित दर्जाची आणि शेतकरी स्वेच्छेने देत असतील अशी कितीही ज्वारी, भात व तांदूळ शासनाकडून खरेदी केला जातो व त्यामुळे शेतकऱ्यांना आधार किंमतीपेक्षा कमी किंमतीस आपले उत्पन्न विकावे लागत नाही.

१९७८–७९ मध्ये आधार किंमतीस खरेदी योजनेनुसार फेब्रुवारी १९७९ च्या मध्यास खरेदी केलेली ज्वारी व भात अनुक्रमे ७१,००० टन व २८,००० टन होते.

४३. भारत सरकारने, राज्य शासनाशी विचारविनिमय केल्यानंतर जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन-नि-वाटप याविषयीची एक योजना तयार केली. या योजनेत वस्तूंच्या उत्पादनाच्या तसेच रास्त किंमतीस त्यांच्या वितरणाचा समावेश तर आहेच त्याशिवाय दुर्बल घटक व ग्रामीण जनता यांच्या गरजा भागविणे हा त्या योजनेचा खास उद्देश आहे. या योजनेचा तपशील ठरविण्यात येत आहे. व १ जुलै १९७९ या नेमून दिलेल्या तारखेस योजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात केली जाईल.

४४. विनिर्दिष्ट क्षेत्रांतील अनुसूचित जमातीमध्ये सावकारी करण्यास प्रतिबंध करण्यासाठी, गरजू व्यक्तींच्या मदतीसाठी शासनाने २५८ आदिवासी सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत. व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या पिळवणुकीपासून जनजातीच्या व्यक्तींचे संरक्षण करण्यासाठी विनिर्दिष्ट शेतमाल व वनोत्पादने यांच्या एकाधिकार खरेदीची योजना शासनाने सुरू केली आहे. ही उत्पादने महाराष्ट्र जनजातींची आर्थिक स्थिती (सुधारणा) अधिनियमाच्या कक्षेत आणली गेली आहेत. या योजनेनुसार खरेदी करण्याच्या प्रयोजनासाठी पुणे येथील महाराष्ट्र राज्य सहकारी जनजाती विकास महामंडळ मर्यादित, यास शासनाचे प्रमुख एजंट म्हणून नियुक्त करण्यात आले

आहे. या जनजाती विकास महामंडळाने सुमारे रु. ४ कोटी किंमतीचा ३,८६,८३१ क्विंटल शेतमाल व गौण वनोत्पादने यांची खरेदी केली. शासनाने, महाराष्ट्र जनजातींची आर्थिक स्थिती (सुधारणा) अधिनियमान्वये उपभोगासाठी अर्थसहाय्याची तरतूद करण्याकरिता एक 'उपभोग वित्त वाटप फिरता निधी' उभारला आहे. समाज कल्याण संचालनालयाच्या यंत्रणेत वाढ करून, मागास वर्ग आणि सामाजिक व शारीरिक दृष्टया अपंग लोकांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी शास्त्रशुद्ध नियोजन करण्याकरिता विविध उपाय योजिले जात आहेत.

४५. माझ्या शासनाने, 'महात्मा फुले मागास वर्ग विकास महामंडळ' नावाच्या एका महामंडळाची स्थापना केली आहे. महामंडळाच्या कार्यास नुकतीच सुरुवात झाली असून आगामी वित्तीय वर्षात, महामंडळाच्या कार्यास पूर्ण वेग येईल. या महामंडळाच्या कार्यात राज्य शासनाच्या बरोबरीने सहभागी होण्याची तयारी भारत सरकारने दर्शविली आहे.

४६. राष्ट्रीय महिला कार्य योजनेचा (नॅशनल प्लॅन ऑफ ॲक्शन फॉर विमेन) भर, स्त्रियांचा आर्थिक व सामाजिक विकास, स्त्रियांना असलेल्या नोकऱ्यांच्या संधीमध्ये वाढ करणे, आरोग्य सेवा व त्यांच्या आरोग्य रक्षणासाठी असलेल्या सोयी वाढविणे इत्यादी गोष्टींवर आहे. माझ्या शासनाने, या क्षेत्रात विशिष्ट कार्यदिशा सुचविण्यासाठी तीन मंडळे स्थापन केली आहेत. शासनाने स्त्रियांच्या विकासासाठी, राज्य पातळीवर एका समितीची स्थापना केली असून तिची एक कर्णधार समितीदेखील आहे. तीन मंडळांचे अहवाल लवकरच तयार होतील अशी अपेक्षा आहे आणि त्यानंतर स्त्रियांच्या--विशेषतः समाजातील दुर्बल घटकांतील स्त्रियांच्या--आर्थिक व सामाजिक कल्याणासाठी उपयुक्त ठरतील असे उपाय शासनाला योजणे शक्य होईल अशी आशा आहे.

४७. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची कार्ये, विशेषतः सुट्टी-शिबिरे व डॉर्मिटरीज यांचे परिरक्षण, पर्यटकांना राज्यातील महत्त्वाची प्रेक्षणीय स्थळे अंतर्भूत असलेल्या, वाहतुकीच्या सोयी पुरविणे, प्रसिद्धीचे लेख व भेट वस्तू इत्यादी निर्माण करणे इत्यादींसारखी कार्ये जोमाने चालू आहेत. स्पोर्ट्स क्लब्ज, व्यायाम शाळा, क्रीडा केंद्रे इत्यादींसारख्या स्वेच्छा संघटनांना आपली खेळ व क्रीडाविषयक कार्ये चालू ठेवता यावीत यासाठी शासन त्यांना आर्थिक मदत देत असते. स्वतः शासनदेखील अनेक क्रीडा महोत्सव, क्रीडा सत्रे, खेळ इत्यादींच्या खास शिक्षणाची शिबिरे भरवीत असते.

४८. महाराष्ट्र चित्रपट, रंगमंच व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या, गोरेगाव येथील शहर प्रकल्प व इतर प्रकल्प यांचा विकास करण्यासाठी, मोठ्या महत्त्वाकांक्षी योजना आहेत. महामंडळाची कार्ये वाढली असून चालू वित्तीय वर्षात महामंडळ प्रगतीचा फार मोठा टप्पा गाठू शकेल अशी आशा आहे.

४९. वीज क्षेत्रासाठी नियमितपणे वाढती आर्थिक तरतूद करण्याची आजवरची प्रथा १९७९–८० मध्येदेखील चालू ठेवण्यात येईल. १९७८-७९ मध्ये एकूण ४९० मे.वॅ. एवढ्या क्षमतेची भर घालावयाची आहे. यामध्ये कोराडी युनिट--५, कोयना युनिट--४, नाशिक युनिट--३ ही युनिट्स सुरू करण्यात येतील.

१९७९–८० मध्ये अधिक गावांना आणि पंपांना विजेचा पुरवठा करण्याचे योजिले आहे. यामध्ये, जनजाती गावे आणि जनजाती क्षेत्रांमधील पंप आणि हरिजन वस्त्या यांना विजेचा पुरवठा करण्याचाही समावेश आहे.

५०. माननीय सदस्यहो, पाच आठवड्यांच्या या अधिवेशनामध्ये आपल्यापुढे सादर करण्यात येतील अशा पूरक मागण्यांवर आणि लेखानुदान अर्थसंकल्पावरसुद्धा आपल्याला विचार करावयाचा आहे. अध्यादेशाचे रूपांतर करण्याच्या विधेयकांवरदेखील आपल्याला विचार करावयाचा आहे. शासनाकडून मांडण्यात येणारी तातडीच्या स्वरूपाची नवीन विधेयके आपल्यापुढे विचारार्थ यावयाची आहेत, त्याचप्रमाणे इतर काही शासकीय कामकाज तसेच तातडीच्या स्वरूपाचे बिनशासकीय कामकाजही आपल्यासमोर विचारार्थ आणले जाण्याची शक्यता आहे.

५१. या वर्षी पुढील विधेयके विचारार्थ घेतली जाण्याची शक्यता आहे :—

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे व सुधारणा) विधेयक, १९७९.

(२) महाराष्ट्र खार जमिनी विकास विधेयक, १९७९.

(३) महाराष्ट्र (रस्त्यावरून वाहून नेण्यात येणाऱ्या) मालांवरील कर (सुधारणा) विधेयक, १९७९.

(४) मुंबई मोटार वाहने कर (सुधारणा) विधेयक, १९७९.

(५) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करणे (सुधारणा) विधेयक, १९७९.

(६) महाराष्ट्र ऋणग्रस्तांना सहाय्य करण्याबाबत (वसुली तात्पुरती लांबणीवर टाकणे) (सुधारणा) विधेयक, १९७९.

(७) मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, १९७९.

(८) महाराष्ट्र निवासी जागांवर कर (वैधकरण व सुधारणा) विधेयक, १९७९.

(९) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, १९७९.

(१०) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना (सुधारणा) विधेयक, १९७९.

(११) महाराष्ट्र (पूरक) विनियोजन विधेयक, १९७९.

(१२) महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, १९७९.

(१३) महाराष्ट्र कर अधिनियम (सुधारणा) विधेयक, १९७९.

(१४) मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयक, १९७९.

(१५) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, १९७९.

(१६) मुंबई ग्राम पंचायत (सुधारणा) विधेयक, १९७९.

(१७) मुंबई विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, १९७९.

(१८) महाराष्ट्र वीज पुरवठा उपक्रम (संपादन) विधेयक, १९७९.

(१९) महाराष्ट्र कच्चा कापूस (खरेदी, प्रक्रिया व विक्री) (सुधारणा) विधेयक, १९७९.

अशा प्रकारे आपल्यापुढे एक भरगच्च कार्यसूची आहे.

५२. मी आपला अधिक वेळ घेणार नाही. आपण सर्वजण विधानमंडळ सदस्य या नात्याने आपापली कर्तव्ये आस्थेवाईकपणे पार पाडाल अशी मला खात्री आहे. आपणा सर्वांना मी सुयश चिंतितो.

जय हिंद !

मुद्रणस्थळ : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई